ePaper
| वर्ष - 6 | अंक - 47 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार , दिनांक 22 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आधी किंमती भरमसाठ वाढवायच्या... कर कपातीवर उद्धव ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया



### आतील पानांत

- राज ठाकरेंच्या सभेदिवशीच मनसेला पुण्यात पाडणार खिंडार
- 'मिशन-२०२२'साठी पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाची जोरदार मोर्चेबांधणी!
- तीन खुनांच्या घटनांनी औरंगाबाद



आगामी निवडणूक ही पक्षाच्या दृष्टीने प्रतिष्ठेची आहे; म्हणून शहर कार्यकारिणीने बूथ यंत्रणा मजबूत करावी. केंद्र सरकार व राज्यातील तत्कालीन भाजपा सरकारच्या कामांची माहिती शेवटच्या घटकांपर्यंत पोचवावी. या निवडणुकीत इच्छुकांना ऑनलाईन अर्ज करता येणार असून त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विचारांना घराघरांत पोचवण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याची आहे.

**चंद्रकांत पाटील**, प्रदेशाध्यक्ष भाजपा

आमची एक जागा निवडून जाऊन आमच्याकडे काही मते शिल्लक आहेत. ती मते शिवसेनेच्या उमेदवाराला देणार आहोत. दोन वर्षांपूर्वी राज्यसभेची निवडणूक झाली होती. त्यावेळी मी मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की आम्हाला दोन जागा पाहिजे. त्यावेळी त्यांनी ती विनंती मान्य केली होती. त्यामुळे आता दुसरी जागा शिवसेना लढवणार आहे. त्यामुळे शिवसेना जो उमेदवार देईल त्याला आम्ही पाठिंबा देऊ. इतर कोणालाही नाही. शिवसेना ठरवेल त्यालाच मतदान करणार

- **शरद पवार**, अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी



## आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्व 139 जागा लढणार

# आता पिंपरी-चिंचवडच्या मैदानात 'आप'!

## स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवारांना संधी : शहर प्रवक्ते प्रकाश हगवणे यांची माहिती

| पिंपरी | महाईन्यूज |

आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी सज्ज झाली असून महापालिकेच्या सर्व म्हणजे 139 जागा लढणार असून www.aappimprichinchwad.org/application-form-for-candidature/ या वेबसाईटच्या माध्यमातून शहरातील सर्व स्तरातील इच्छुक नागरिकांकडून उमेदवारी अर्ज मागवण्यात येत आहेत.

देशाच्या राजकारणात आपल्या कामामुळे वेगळी ओळख निर्माण करणारा आम आदमी पक्ष आता फक्त दिल्ली, पंजाब अथवा उत्तर भारतापुरता मर्यादित न राहता सर्व देशात लोकप्रिय होत आहे, महाराष्ट्रात देखील पक्षाची संघटना वाढत असून महनगरांमध्ये पक्षाची बांधणी चांगली होत आहे. मागील काही वर्षांत लोकांच्या दैनंदिन आयुष्यातील समस्या सोडवण्यावर पक्षाने भर देत शहरांतील अनेक प्रलंबित कामे सत्ताधाऱ्यांचा पाठपुरावा करत मार्गी लावली आहेत. याच भरीव कामगिरीच्या आधारावर सामान्य जनतेच्या मनात आपली एक वेगळी ओळख निर्माण करण्यात यश मिळवले आहे. आपचे शहर प्रवक्ते प्रकाश हगवणे यांनी सांगितले की




निवडणुकीच्यानिमित्ताने पिंपरी चिंचवड आणि पुणे महापालिका क्षेत्रात आप तर्फे प्रचाराला सुरुवात झाली असून व पक्षाची कामे लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू आहे. शहरासाठी आणि शहरवासीयांसाठी भरीव योजनांची यादीच सादर करण्यात आली असून, त्यात शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधांचा विकास, स्वच्छता, शहर सुशोभीकरण, कायदा सुव्यवस्था आदी महत्वपूर्ण मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे.

### कार्यकर्त्यांच्या बळावर निवडणुकीच्या रिंगणात...


आपल्या कामांच्या आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या बळावर आप देखील महापालिकेच्या रिंगणात उतरत आहे, भ्रष्टाचाराविरुद्ध चा लढा, दिल्लीचे गव्हर्नन्स मॉडेल आणि सामान्य जनमानसाला केंद्र स्थानी ठेऊन सत्तेमार्फत मुलभूत बदल घडविण्याच वचन देत पक्ष निवडणूक रिंगणात तयारी ने उतरला आहे. प्रस्थापितांना धक्का देण्याची ताकत फक्त आम आदमी पक्षात आहे हे अधोरेखित करत समाज आणि राजकारण बदलासाठी पुढे येत स्वच्छ चारित्र्याच्या जनसामान्यांना महापालिकेच्या निवडणुकीत उतरण्याचे आवाहन आपचे पिंपरी-चिंचवड कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे केले आहे. आपतर्फे ऑनलाईन अर्ज देखील उपलब्ध. पक्षातर्फे सादर केलेल्या परिपत्रकाद्वारे इच्छुक उमेदवारांनी पिंपरी चिंचवड तथा पुणे स्थित आपच्या नेत्यांशी संपर्क साधावा, तसेच ऑनलाईन अर्ज भरण्याची देखील व्यवस्था पक्षातर्फे करण्यात आलेली आहे, अर्ज स्विकारनी नंतर इच्छुकांशी संपर्क साधण्यात येईल व पुढील उमेदवारी प्रक्रिये साठी मार्गदर्शन करण्यात येईल असे आपचे पिंपरी-चिंचवड प्रचार प्रमुख राज चाकणे यांनी सांगितले.

# लोणावळ्याजवळील दुधिवरे खिंडीची वाट बिकट

## दुधिवरे खिंडीच्या मार्गाचा स्थानिक नागरिकांसह पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात वापर

| लोणावळा | महाईन्यूज |

**लोणावळा** पवनानगर प्रवासासाठी जवळचा रस्ता म्हणून दुधिवरे खिंडीच्या मार्गाचा स्थानिक नागरिकांसह पर्यटक वापर करतात. मात्र मागील काही वर्षांपासून हा प्रवास धोकादायक झाला आहे. दुधिवरे खिंड परिसरात रस्त्यावर मोठेमोठे खड्डे पडले आहेत.अनेक ठिकाणी चढ आणि उतारावर रस्ता वाहून गेला आहे.



"लोणावळा ते औढे दरम्यान बहुतांश रस्ता झाला आहे. दुधिवरे खिंडीच्या दोन्ही बाजूचे काम तसेच असल्याने मोठमोठे खड्डे पडले आहेत.एका बाजूला चढण आणि दुसरीकडे उतार असल्याने याठिकाणी हमखास अपघात होत आहेत.पुढे पवनानगरपर्यंत हीच परिस्थिती असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.मुदतीत काम न करणाऱ्या ठेकेदार यांना काळ्या यादीत टाका तर कामांकडे दुर्लक्ष करणाNया अधिकाNयांना खुच्र्या खाली करायला लावा, अशी मागणी स्थानिक रहिवासिकडन होत आहे.

- **ओमप्रकाश परंडवाल**
रहिवासी, पवनानगर

परिणामी येथे मोठ्या प्रमाणात खडी रस्त्यावर पसरली आहे.यामुळे वाहने घसरुन सतत अपघात घडत आहेत. असे असताना सार्वजनिक बांधकाम विभाग असो वा रस्त्याचे काम करणारा ठेकेदार याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांनीच सांगावे, की या रस्त्यावरुन वाहने कशी चालवावीत, असा संतप्त सवाल रहिवाशांनी उपस्थित केला आहे.

### शिवसेनेचा महाराष्ट्र नविर्माण सेनेला दे धक्का!

# राज ठाकरेंच्या सभेदिवशीच मनसेला पुण्यात पाडणार खिंडार!

## आज मनसेचे 20 पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करणार

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची औरंगाबाद येथील सभा वादग्रस्त ठरली होती. या सभेनंतर त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला. त्यानंतर आता पुण्यातील सभाही वादळी ठरण्याची शक्यता आहे. या सभेची मनसेकडून युद्ध पातळीवर तयारी सुरू असतानाच शिवसेनेनंही मोठा धक्का देण्याची तयारी केली आहे. या सभेदिवशीच मनसेचे २० पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.



मनसेला लागलेली गळती थांबत नसल्याचे चित्र असताना आता पुण्यात पक्षाला खिंडार पडण्याची चिन्हे आहेत. राज ठाकरेंची आज पुण्यात सभा आहे. उद्याच मनसेचे २० पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. शिवसेनेचे संपर्कप्रमुख सचिन अहिर यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या शहर कार्यालयात उद्या हा कार्यक्रम होईल. यातून राज ठाकरेंच्या सभेदिवशीच मनसेला मोठा धक्का देण्याची खेळी शिवसेनेनी खेळल्याचं समोर येतं आहे. याआधीही पुण्यातील मनसेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी पक्षाला जय महाराष्ट्र केला आहे.

राज ठाकरे यांचा अयोध्या दौरा स्थगित करण्यात आला आहे. राज ठाकरे यांच्या अयोध्या (Ayodhya) दौऱ्यावरुन राजकारण चांगलंच तापलं होतं. राज ठाकरे येत्या पाच जूनला अयोद्धेला जाणार होते. काही कारणामुळे राज ठाकरे यांचा हा दौरा स्थगित केला होता. पुण्यातील सभा मात्र होणार असून, मनसैनिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन राज ठाकरेंनी केले आहे. ही सभा गणेश कला क्रीडा मंच येथे उद्या सकाळी दहा वाजता होणार आहे. या सभेचा टिझरही रिलीज करण्यात आला आहे.

■ सरळ भाषेत समजत नसेल तर एकदा काय ते होऊनच जाऊ दे', अशी टीझरची सुरूवात आहे. त्यानंतर अभी नहीं तो कभी नहीं, हे राज ठाकरे यांच्या औरंगाबादच्या सभेतील भाषणातील वाक्यही त्यामध्ये आहे. त्यावरून आता राज ठाकरेंची तोफ पुण्यातही धडाडणार असल्याचे स्पष्ट झालं आहे. प्रामुख्याने औरंगाबाद येथील औरंगजेबाच्या समाधीचा मुद्दा त्यांच्याकडून प्रखरपणे मांडला जाऊ शकतो. बुडाला औरांग्या पापी, म्लेंच्छसंव्हार जाहाला, मोडलीं मांडली छेत्रें, आनंदवनभुवनीं! असंही टीझरमध्ये लिहिलं आहे.

# समविचारींचे नेतृत्व काँग्रेसने करावे; अन्यथा पुढील प्रवास खडतर...

## काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे परखड मत

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**



'आगामी काळात येणाऱ्या राजकीय परिस्थितीत सर्व समविचारी पक्षांना एकजूट करण्याची गरज असून त्यासाठी काँग्रेसने पुढाकार घ्यायला हवा. देशात व्यापक समविचारी पक्षांची आघाडी होणे आणि पर्यायी विरोधी पक्ष उभा करण्याची जबाबदारी काँग्रेसची आहे. आता काँग्रेस पक्षाने लोकशाही बळकट करून नेतृत्व करायची भूमिका घेतली नाही, तर पुढील प्रवास खडतर असून त्याचीच चिंता वाटते," असे परखड मत मांडत काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आपल्याच पक्षाला घरचा आहेर दिला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडीज आणि महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. श्रीपाल सबनीस लिखित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत सामाजिक क्रांती' या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी झाले. यावेळी चव्हाण बोलत होते. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, आमदार डॉ. सुधीर तांबे, विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे, सभेचे कार्याध्यक्ष सचिन ईटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

■ पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली लोकशाही टिकविण्यासाठी तयार केलेली चौकट म्हणजे संविधान आहे. आणि ही लोकशाही टिकविण्याची दुसरी सामाजिक क्रांती आपल्याला करावी लागणार आहे. सध्या भारतीय राज्यघटनेला सुरुंग लावण्याचे काम सुरू असून हा धोका निर्माण झाला आहे.



# पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी घेतली सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांची बैठक

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

शहरातील कायदा सुव्यवस्थेला बाधा न आणता शांततेत आंदोलन करा. राजकीय नेत्यांच्या घराबाहेर आंदोलन करू नका तसेच नेत्यांच्या वाहनांचा ताफाही अडवू नका. आंदोलन ठरवून दिलेल्या ठिकाणी करा. आंदोलन करताना कायदा सुव्यवस्थेला बाधा आणू नका, अशा सूचना पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी सर्वपक्षीय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बैठकीत शनिवारी दिल्या. गेल्या काही महिन्यांपासून विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचे आरोप-प्रत्यारोप तसेच आंदोलनांमुळे शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालयात शनिवारी सर्वपक्षीय कार्यकर्ते तसेच पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार माधुरी मिसाळ, शिवसेनेचे शहरप्रमुख संजय मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, प्रवक्ते अंकुश काकडे, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष साईनाथ बाबर आदी यावेळी उपस्थित होते.

### लाल महालात लावणीचा व्हिडीओ शूट केल्याप्रकरणी राज्यातील राजकीय वातावरण तापले

# पुण्यातील लाल महालात लावणी; वैष्णवी पाटीलचा माफीनामा

## व्हिडीओवर आक्षेत घेत संबंधितांवर कारवाई करण्याची संभाजी ब्रिगेडद्वारे मागणी



**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

पुण्यातील ऐतिहासिक लाल महालात लावणीचा व्हिडीओ शूट केल्याप्रकरणी राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. ज्यावर अनेक राजकीय, सामाजिक आणि कलाविश्वातील लोकांकडून उलट-सुलट प्रतिक्रिया येत आहेत. दरम्यान संभाजी ब्रिगेडनेही या व्हिडीओवर आक्षेत घेत संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी तक्रार दाखल केली आहे. याच पार्श्वभूमीवर आज राज्याचे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी देखील आक्षेप नोंदवत पुणे पोलिसांना कारवाईचे आवाहन केलेय. दरम्यान लाल महालात लावणी सादर करणाऱ्या वैष्णवी पाटीलने सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट करत माफी मागितली आहे.

### लालमहालातील लावणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

▶▶ व्हायरल व्हिडीओमध्ये मराठीतील चंद्रमुखी या सिनेमातील चंद्रा या गाण्यावर संबंधित तरुणी डान्स करताना दिसतेय. प्रसाद ओक दिग्दर्शित या गाण्यावर तरुणी पुण्यातील लाल महालातील मध्यवर्ती ठिकाणी थिरकताना दिसतेय. संबंधित तरुणी लावणीवर बेभान होऊन नाचताना दिसतेय. पुण्याच्या ऐतिहासिक लाल महालात लावणीचा व्हिडीओ शूट केल्याने अनेक राजकीय संघटना आक्रमक झाल्यात. कुलदीप बापट यांनी या गाण्याचे शूटिंग केले असून वैष्णवी पाटील यांनी यात लावणी केली आहे. इन्स्टाग्रामवर रिल्स शेअर करण्यासाठी तिने चक्क लाल महालात ही लावणी केली.

### लावणीच्या व्हिडीओला जितेंद्र आव्हाडांचा विरोध

▶▶ लाल महालातील लावणीच्या या व्हिडीओ राज्याचे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड (JITENDRA AWHAD) यांनी आक्षेप नोंदवला आहे. तसेच नागरिकांना असे प्रकार पुन्हा करू नये असा आवाहन केलेय, यावर मंत्री जितेंद्र आव्हाड ट्विट करत म्हणाले की, पुण्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा लाल महाल ही वास्तू नाच गाण्यांचे चित्रीकरण करण्याची जागा नव्हे, यापुढे असे होता कामा नये, कोणी केले असेल तर चित्रीकरण वापरू नका. पुण्यातील ऐतिहासिक लाल महालात डान्सर वैष्णवी पाटील नामक तरुणी बेभान होऊन चंद्रमुखी सिनेमातील चंद्रा गाण्यावर थिरकताना दिसत आहे.

## शॉर्ट न्यूज »

### आधी केला सुनेवर हल्ला, नंतर सासऱ्याची आत्महत्या...




।चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

सुनेवर खुनी हल्ला करून सास-याने घराच्या छतावरून उडी मारून आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी (दि. 21) दुपारी अडीच वाजता बेलठीकानगर थेरगाव येथे घडली. सुशील सुर्यकांत वनवे (वय 38, रा. बेलठीकानगर, थेरगाव) यांनी याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सुर्यकांत मारुती वनवे (वय 74) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे फिर्यादी यांचे वडील होते. शुक्रवारी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास सुर्यकांत यांनी फिर्यादी यांच्या पत्नीला अज्ञात कारणावरून जीवे मारण्याच्या उद्देशाने हत्याराने डोक्यावर मारहाण केली. त्यात फिर्यादी यांची पत्नी गंभीर जखमी झाल्या त्यानंतर आरोपी सुर्यकांत यांनी स्वताच्या घराच्या छतावरून उडी मारून आत्महत्या केली. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

### पिंपरी महापालिकेची निवडणूक भाजपसाठी प्रतिष्ठेची : चंद्रकांत पाटलांची कबुली

# ‘मिशन-2022’साठी पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाची जोरदार मोर्चेबांधणी!

### भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, प्रभारी माधुरी मिसाळ यांची आढावा बैठक

। पिंपरी । महाईन्यूज ।




पिंपरी-चिंचवड महापालिका आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने जोरदार मोर्चेबांधणी केली असून, प्रदेश नेतृत्त्वाने स्थानिक राजकारणात लक्ष घातले आहे. विशेष म्हणजे, बूथ यंत्रणा सक्षमीकरणावर भर दिला असून, 'यंदाचा निर्धार १०० पार', असा संकल्प करण्यात आला आहे.

प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील व पिंपरी-चिंचवडच्या प्रभारी आमदार माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत शहरकार्यकारिणीची शनिवारी आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, माजी महापौर माई ढोरे, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष उमा खापरे, प्रदेश चिटणीस अमित गोरखे, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, प्रदेश कार्यकारिणी सदस्य अमर साबळे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, कायदा आघाडीचे प्रदेश सह संयोजक सचिन पटवर्धन, दक्षिण भारत आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्रदेश निमंत्रित सदस्य संतोष कलाटे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, राजू दुर्गे, विजय फुगे, सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी महापौर नितीन काळजे, प्रदेश युवा मोर्चा उपाध्यक्ष अनुप मोरे, महिला आघाडी शहराध्यक्ष उज्वला गावडे, युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे आदी उपस्थित होते.

#### येत्या 5 जूनला कार्यकारिणीची मॅरेथॉन बैठक...

पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणीच्या कामकाजाचा आढावा आणि आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणीबाबत येत्या ५ जून रोजी महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय होणार आहेत. त्याअनुशंगाने शहर कार्यकारिणी कामाला लागली आहे. शक्तिकेंद्र आणि यादी प्रमुखांपर्यंत सर्वांनी जबाबदारी विभागून घेतली आहे. सत्ताकाळात शहरात भाजपाने केलेल्या विकासकामांची जागृती शहरातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे, असेही प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, आगामी निवडणूक ही पक्षाच्या दृष्टीने प्रतिष्ठेची निवडणूक होणार आहे. भाजपा शहर कार्यकारिणीने बूथ यंत्रणा मजबूत करावी. केंद्र सरकार आणि राज्यातील तत्कालीन भाजपा सरकारने केलेल्या कामांची माहिती शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचली पाहिजे. या निवडणुकीसाठी इच्छुकांना ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भारताची वाटचाल महासत्तेच्या दिशेने सुरू आहे. त्यांच्या विचारांना घराघरात पोहोचवण्याची जबाबदारी भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याची आहे.

# अबब... पिंपरी-चिंचवड शहरात एकाच दिवशी चोरीच्या आठ घटना...!

### दोन लाख 60 हजारांचा मुद्देमाल चोरीला

पिंपरी । महाईन्यूज

पिंपरी चिंचवड शहरात चोरीचे आठ गुन्हे शुक्रवारी (दि. 20) दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये सहा दुचाकी, एक इको गाडी आणि केबल वायर असा एकूण दोन लाख 60 हजारांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

दत्तवाडी आकुर्डी येथून 80 हजार रुपये किमतीची एक इको कार चोरीला गेली आहे. याप्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरगाव येथून शेतातील



खोलीतून अज्ञात चोरट्यांनी 40 हजार रुपये किमतीची 600 फूट लांब केबल वायर चोरून नेली. याप्रकरणी शिरगाव चौकीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### दुचाकी चोरीचे वाढते प्रमाण...

चाकण, चिखली, हिंजवडी आणि वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सहा दुचाकी चोरीला गेल्या आहेत. चाकण मधून 20 हजारांची एक, चिखली मधून अनुक्रमे 20 हजार, 30 हजार, 20 हजार रुपये किमतीच्या तीन दुचाकी चोरीला गेल्या आहेत. तर हिंजवडी मधून 30 हजार आणि वाकड मधून 20 हजारांची दुचाकी चोरीला गेली आहे. पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

## जेलमधील आरोपीने जेलमधून सुटलेल्या आरोपीला दिली सुपारी


भोसरी । महाईन्यूज

बायको तिच्या मानलेल्या भावासोबत फिरते म्हणून त्या मानलेल्या भावाला मारण्यासाठी महिलेच्या पतीने जेलमधून एका नुकताच बाहेर आलेल्या आरोपीला सुपारी दिली. त्यानुसार जेलमधून आलेल्या आरोपीने महिलेच्या मानलेल्या भावाला मारहाण केली. ही घटना बुधवारी (दि. 18) दुपारी चार वाजता गावजत्रा मैदान भोसरी येथे घडली. अमित बाळासाहेब भालेराव (वय 34, रा. दिघी रोड, भोसरी) यांनी याप्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रुपेश पाटील आणि त्याच्या सोबतच्या इसमांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तालेरा रुग्णालयात आग, रुग्णालय परिसरात धुराचे लोट

पिंपरी । महाईन्यूज

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिंचवड येथील तालेरा रुग्णालयाच्या बेसमेंटमधील प्रवेशद्वाराच्या बाजूलाच आज शनिवार दुपारी सव्वा चारच्या सुमारास आग लागली. चिंचवड भागात सकाळपासून वीज नसल्याने जनरेटरवर रुग्णालयाचा वीजपुरवठा सुरू होता. सकाळपासून जनरेटर सुरू असल्याने बॅटऱ्या तापल्याने आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या आगीमुळे धुराचे लोट रुग्णालय परिसरात पसरले. तर रुग्णालयातील पाच महिला आणि लहान बाळांना त्वरित थेरगाव रुग्णालयात स्थलांतरीत करण्यात आले. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पावसाळा पूर्वीची कामे करण्यासाठी



चिंचवड परिसरात आज सकाळपासूनच वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. त्यामुळे महापालिकेच्या तालेरा रुग्णालयात सकाळी 10 वाजतापासून जनरेटरवर वीजपुरवठा सुरू होता. मात्र, दुपारी सव्वा चारच्या सुमारास बॅटऱ्या प्रचंड तापल्याने आग लागली. आग लागल्याने रुग्णालयातील अग्निशमन यंत्रणा आपोआप सुरू झाली. त्यामुळे आग काही प्रमाणात आटोक्यात आली होती. तसेच आगीची वर्दी मिळताच अग्निशमन दलाच्या थेरगाव, प्राधिकरण आणि रहाटणी केंद्राचे पाच बंब घटनास्थळी दाखल झाले.

## संपादकीय »

# महिलांना पूर्ण स्वातंत्र्य मिळालेय का?

***स्त्रियांना शिकवण्याचे महत्त्व समजल्याने महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शाळेस झालेला विरोध मोडून काढण्यासाठी त्यांनी बळाचा वापर केला नाही. त्यांनी एका परित्यक्तेच्या मुलाला दत्तक घेऊन जी अभिजातता दाखवली, ती त्यांच्या वैचारिक उंचीचे दर्शन घडवणारी होती. पतीच्या निधनानंतर त्याच्या चितेवर उडी मारून स्वत:ला जाळून घेण्याची सक्ती करणारी सती ही प्रथा क्रूरता आणि निर्घृणता यांचे प्रतीक होती.***

पतीचे निधन झालेल्या स्त्रीला 'विधवा' म्हणू नये, असे न्यायालयाने याआधीच बजावून झाले. घटस्फोट झाल्याने किंवा पती घर सोडून गेल्याने स्त्रीला वैधव्य प्राप्त होत नाही. तरीही तिचे जगणे तेवढेच खडतर राहाते. स्त्रियांना शिकवण्याचे महत्त्व समजल्याने महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शाळेस झालेला विरोध मोडून काढण्यासाठी त्यांनी बळाचा वापर केला नाही. त्यांनी एका परित्यक्तेच्या मुलाला दत्तक घेऊन जी अभिजातता दाखवली, ती त्यांच्या वैचारिक उंचीचे दर्शन घडवणारी होती. पतीच्या निधनानंतर त्याच्या चितेवर उडी मारून स्वत:ला जाळून घेण्याची सक्ती करणारी सती ही प्रथा क्रूरता आणि निर्घृणता यांचे प्रतीक होती. ही प्रथा बंद करण्यासाठी बंगालमधील विचारवंत आणि समाजधुरीण राजा राममोहन रॉय यांनी आंदोलनाला सुरुवात केली. तेव्हा भारतात ब्रिटिशांचे राज्य असल्याने कोलकात्यातील या आंदोलनाला सरकारने सहिष्णुतेने उत्तर देण्यासाठी सतीची प्रथा बंद करणारा कायदाच केला. तरीही प्रश्न पूर्णत्वाने सुटण्याची शक्यता नव्हतीच. याचे कारण लहानपणीच विधवा झालेल्या मुलीस तिचे पुढील सारे आयुष्य आसपासच्या पुरुषांच्या वखवखलेल्या नजरांच्या तुरुंगात राहूनच व्यतीत करावे लागत होते. महात्मा फुले यांनी त्यासाठी स्त्रीला शिकवण्याचा मार्ग निवडला. त्याने मात्र हळूहळू मोठाच परिणाम झाला. तरीही ग्रामीण भागातील महिलांना शहरांतील महिलांच्या तुलनेने स्वातंत्र्याचा पूर्ण स्पर्श झालेला नाही, याचा प्रत्यय आजही येताना दिसतो. हेरवाड या गावात चर्मकार समाजातील एका व्यक्तीचे निधन झाल्यानंतर सरपंच सुरगोंडा पाटील यांनी त्या घरी जाऊन सांत्वन करतानाच पत्नीला विधवा प्रथांपासून दूर ठेवण्याची विनंती केली. त्या समाजातील नेत्यांनीही त्यास दुजोरा दिला आणि संपूर्ण गावानेच विधवा प्रथांना बंदी घालण्याचा निर्णय घेतला.



## आनंदी सकाळ

# वाहूं हा संसार देवापायी।

प्रत्येक व्यक्तीचा संसाराशी असलेला संबंध कितीही प्रयत्न केला, तरी सुटत नाही. याचे मूळ कर्म आहे. भगवंत सांगतात, 'मनुष्य पराधीन असल्याने कर्म करावेच लागते.' म्हणून संसार कायम असतो. देवापासून मानवापर्यंत सर्वांनी गृहस्थाश्रमातच जन्म घेतला. सर्व संतांनी प्रपंच परमार्थमय करून, मोक्षप्राप्ती करून घेतली. त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारून समाजाला 'कर्तव्य करीत राहणे हीच ईश्वरसेवा,' अशी शिकवण दिली. माऊली म्हणतात, 'अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।।' संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांनी, 'घालूं तयावरी भार। वाहूं हा संसार देवापायी।।' या उक्तीतून मानवाला संदेश दिला. संत एकनाथमहाराज प्रापंचिक असूनही त्यांचे परमार्थात लक्ष होते, हा आदर्श आहे. संसार व परमार्थ एकमेकांना पूरक आहेत. एक सुभाषित आहे, 'ज्या घरात आनंद, मुले बुद्धिमान, गोड बोलणारी पत्नी, चांगला मित्र, सुसंपन्नता, कौटुंबिक जिव्हाळा, आज्ञाधारक सेवक, अतिथींचे स्वागत, रोज पूजाअर्चा, सात्विक अन्न, सज्जनसंगती आहे असा गृहस्थाश्रम धन्य होय.' असा गृहस्थ संसारात कितीही दुःखाचे प्रसंग आले, तरी डळमळत नाही.

# तिरंग्याची शान जगज्जेती निखत झरीन!



## भूमिका

मेरी कोम भारतासाठी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील सर्वात यशस्वी बॉक्सिंगपटू राहिली आहे. मेरीने (२००२, २००५, २००६, २००८, २०१०, २०१८ ) एकूण सहा सुवर्णपदके (एक रौप्य आणि एक कांस्यपदक) आहेत. यानंतर सरिता देवी (२००६), जेनी आरएल (२००६) आणी लेखा केसी (२००६) यांनी सुवर्णकामगिरी केली आहे. निखत ही सुवर्णपदक मिळवणारी केवळ पाचवीच बॉक्सिंगपटू आहे. २०१८ नंतर हे भारताचे पहिले सुवर्णपदक आहे. नुकत्याच पार पडलेल्या स्पर्धेत भारताने तीन पदके मिळवली. त्यामुळे भारताची स्पर्धेतील एकूण पदकांची संख्या ही ३९



वर पोहोचली आहे. यामध्ये १० सुवर्ण, ८ रौप्य आणि २१ कांस्यपदकांचा समावेश आहे. एकूण पदकसंख्येच्या बाबतीत भारत रशिया (६०) आणि चीननंतर (५०) तिसऱ्या स्थानी आहे. जागतिक अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरी २००६ मध्ये झाली होती. या स्पर्धेत भारताने एकूण आठ पदके जिंकली होती.

तेलंगणाच्या निझामाबाद जिल्ह्यात जन्मलेल्या निखतने वडिलांच्या मार्गदर्शनाखाली बॉक्सिंगचे धडे गिरवण्यास सुरुवात केली. विशाखापट्टणम येथे तिने कसून सराव केला. २०११मध्ये तुर्कस्थानात झालेल्या कनिष्ठ आणि युवा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिने सुवर्णपदक जिंकत आपली छाप पाडली. २०११मध्येच एका आंतरविद्यापीठ सामन्यादरम्यान तिच्या खांद्याला दुखापत झाली. त्यामुळे जवळपास तिला वर्षभर बॉक्सिंगपासून दूर रहावे लागले. यानंतरही अनेक अडथळ्यांचा सामना करत तिने आपला प्रवास सुरु ठेवला. २०१४मध्ये युवा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिने रौप्यपदक पटकावले. २०१५ च्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. २०१९ आणि २०२२ मध्ये तिने स्ट्रँडजा स्मृती बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण आणि थायलंड खुल्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत रौप्यपदकाची कमाई केली.


२०१९ मध्ये निखत समाजमाध्यमांवर चर्चेचा विषय ठरत होती. मात्र ऑलिम्पिक पात्रता फेरीसाठी सहा वेळा जागतिक विजेतेपद मिळवणाऱ्या मेरी कोमविरुद्ध तिला सामना खेळायचा होता. याकरिता तिने तत्कालीन क्रीडामंत्री किरेन रिजिजू यांना पत्र लिहिले. यामुळे लोक तिची खिल्ली उडवू लागले. या लढतीत निखतला १-९ असे पराभूत व्हावे लागले. मेरीने सामना संपल्यानंतर तिला हस्तांदोलन करण्यासही नकार दिला. यानंतर निखतने सरावावर लक्ष केंद्रीत केले आणि येणाऱ्या काळात तिने चांगली कामगिरी करत टीकाकारांना चोख प्रत्युत्तरही दिले.

# मानवी उत्क्रांती विचारांचे पुरावे...

**आजचा सुज्ञ मानव विकसित होत गेला तो त्या आधी असलेल्या जातींमध्ये घडत आलेल्या निरनिराळय़ा बदलांमधून. पण त्या आधी असणाऱ्या कुठल्या जातीमधून? ती अदमासे किती वर्षांपूर्वी आढळते? पृथ्वीवरच्या कोणत्या भूभागामध्ये आढळते? गेल्या शतकभरात किमान १९ मनुष्यसदृश जातींचे जीवाश्म सापडले आहेत.**

आजच्या आपल्या अवस्थेतील मनुष्यप्राण्यांना होमोसेपिअन या नावाने ओळखले जाते. या नावाचा शब्दश: अर्थ सुज्ञ किंवा शहाणा मानव असा आहे. होमो/ होमिन या लॅटिन शब्दाचा अर्थ मानव असा आहे. उत्क्रांती विज्ञानामध्ये मनुष्याचे वर्गीकरण प्राणीवर्गात केले जाते. त्याचे शास्त्रीय वर्णन असे- प्राणीवर्ग ( मॅमेलिया): सस्तन/ गण: (ऑर्डर) प्रायमेट / कुल: ( फॅमिली) होमोनिडाई / उपकुल (ट्राइब ) : होमिनिनी/ प्रजाती (जेनस)/ ( स्पिशिज) : आधुनिक मानव ऊर्फ सुज्ञ मानव.

आजचा सुज्ञ मानव विकसित होत गेला तो त्या आधी असलेल्या जातींमध्ये घडत आलेल्या निरनिराळय़ा बदलांमधून. पण त्या आधी असणाऱ्या कुठल्या जातीमधून? ती अदमासे किती वर्षांपूर्वी आढळते? पृथ्वीवरच्या कोणत्या भूभागामध्ये आढळते? गेल्या शतकभरात किमान १९ मनुष्यसदृश जातींचे जीवाश्म सापडले आहेत. उदा. कळीचे



मानावे असे-सर्वात जुना होमो इरेक्टस, होमो अन्टेसेसार, होमो हायडेलबर्गीनीस, होमो निआन्डरथेलनिस, होमो स्टाईनहाईमेन्सिस, डेनिसऑव्हन्स इत्यादी. यामधल्या कोणत्या जातीचे 'सुज्ञ मानवाशी' पूर्वज म्हणून अधिक घनिष्ठ नाते मानता येईल? अर्थात असा निवाडा अनेक गुणांच्या तारतम्याने करावा लागतो. अर्थातच सर्वाधिक प्राधान्य दिले जाते ते घटक असे-

मानवाची ओळख देणाऱ्या अनेक मोलाच्या खुणा आहेत. वानगीदाखल पाहू- चतुष्पादपण झडून द्विपाद होणे. सरासरी उंची, हातपायांतील हाडांची लांबी, मेंदूचा आणि तो बाळगणाऱ्या कवटीचा आकार, त्या कवटीतून मणका आणि मज्जातंतूंच्या जाळय़ाना जोडणारी खोबण कवटीपाशी कुठे आहे? बरोबर खालच्या बाजूला की वरच्या बाजूला जवळ आणि आडवी? दातांची आणि कवळीची ठेवण, भुवया आणि कपाळाचे चढउतार, डोळय़ांची खोबण, कानांची ठेवण आणि आकार. त्याच बरोबरीने दातांमध्ये अडकून राहिलेल्या वनस्पती किंवा मांसाचे ठसे, ओटीपोट आणि कटी प्रदेशाची पोकळी तेथील हाडांचे आकार आणि ठेवण इ. जीवाश्मांच्या अंगी दिसणाऱ्या या 'कळा' आणि लक्षणे, त्यांच्या वावराचे ठिकाण, भूगर्भाचा स्तर या सर्वावरून पूर्वजपणाची कुंडली जोखली जाते. पूर्वज निश्चितीची ही समस्या आजही पूर्णपणे सुटलेली नाही. तीन संभाव्य संक्रमणांची वाटचाल दर्शविणारे चित्र पाहा. त्यावरून यातल्या पूर्वज-पेचाची कल्पना येईल.

## ।। अभंगवाणी ।।



सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥
आळ आला होता आम्ही भांडखोरी ।
तुका म्हणे खरी केली मात ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### राणा दाम्पत्याचे मुंबईतील घराचे बांधकाम अनधिकृतच, बीएमसीने पुन्हा बजावली नोटीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्या मुंबईतील खार येथील घराचे बांधकाम अनधिकृत असल्यामुळे मुंबई मनपाने राणा दाम्पत्याला पुन्हा एकदा नोटीस बजावली आहे. शिवसेनेसोबत वाद सुरू असतानाच आता बीएमसीकडून राणा दाम्पत्याला अनधिकृत बांधकाम प्रकरणात नोटीस बजावण्यात आली आहे मुंबईतील खार परिसरात राणा दाम्पत्याचे घर आहे. या घरात अनधिकृत बांधकाम केल्याचा आरोप याआधीही करण्यात आला होता. या प्रकरणी मुंबई मनपाने राणा दाम्पत्याच्या घराची पाहणी सुद्धा केली होती. मात्र, राणा दाम्पत्याने मुंबई मनपाला आपली बाजू मांडत उत्तर दिलं. परंतु त्यांनी दिलेलं उत्तर अमान्य असल्याचं बीएमसीने म्हटलं आहे. घरात करण्यात आलेल्या बांधकामात नियमांचं उल्लंघन करण्यात आलं आहे.

### भरदिवसा महाविद्यालयीन तरूणीची एकतर्फी प्रेमातून हत्या

# तीन खुनांच्या घटनांनी औरंगाबाद हादरले!

### एकाने मैत्रिणीची हत्या करून स्वतः केली आत्महत्या

। औरंगाबाद । महाईन्यूज । प्रतिनिधी।

औरंगाबाद शहर सकाळी व दुपारच्या सुमारास झालेल्या हत्येने हादरले. दोन दिवसांपूर्वीच औरंगाबादमध्ये एकाने मैत्रिणीची हत्या करून स्वतः आत्महत्या केली होती. डावीकडे आरोपी फरहान खान निजाम खान आणि उजवीकडे मृत साबिर शहा कासीम शहा औरंगाबाद शहर सकाळी व दुपारच्या सुमारास झालेल्या हत्येच्या घटनांनी हादरले. दोन दिवसांपूर्वीच औरंगाबादमध्ये एकाने मैत्रिणीची हत्या करून स्वतः आत्महत्या केली होती. ही घटना ताजी असताना शनिवारी (२१ मे) भरदुपारी एकतर्फी प्रेमातून एका १९ वर्षीय विद्यार्थिनीचा महाविद्यालयापासून जवळच खून करण्यात आला. या दोन्ही गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न झालेले आहेत. मृत १९ वर्षीय विद्यार्थिनी व तिचा मारेकरी हे दोघेही



एकाच समुदायातील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दुसऱ्या घटनेत जिन्सी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी साबिर शहा कासीम शहा (वय ३६) व फरहान खान निजाम खान (वय १९, दोघेही रा. कटकटगेट पाण्याच्या टाकीजवळ) या दोघांमध्ये किरकोळ शिवीगाळ करण्याच्या कारणावरून वाद झाला. फरहानने जवळील एका धारदार वस्तूने साबीरशहा यांच्या पोटात मारुन गंभीर जखमी केले. साबीरशहा याच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, डॉक्टरांनी पहाटे त्याला मृत घोषित केले. यातील बरेच जण रात्री फक्त बटन विकण्याचा व्यवसाय करतात. पोलीस त्या दिशेने तपास करीत आहेत.

### एकतर्फी प्रेमातून घडलेल्या घटनेप्रकरणात पोलीस घटनास्थळी दाखल

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती जिन्सीचे पोलीस निरीक्षक व्ही. एम. केंद्रे यांनी दिली. घटनास्थळी केंद्रे यांच्या एपीआय मगरे आदींसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली. तपासासाठी गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक तांगडे सुनील जाधव यांना आरोपीचा शोध घेण्यासाठी नारेगाव येथे रवाना करून आरोपीस ताब्यात घेतले आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले आहे. तसेच पंचनामा उपनिरीक्षक हारुण शेख यांच्या पथकाने केला. दरम्यान, आरोपीची मोठी टोळी असून त्यात सर्व अल्पवयीन व १८ वर्षापर्यंतची मुले असल्याची प्राथमिक माहिती आहे.

### औरंगाबादमधील तिसरी खुनाची घटना

औरंगाबाद शहरातील जवाहरनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणात आता दाखल गुन्ह्यात खुनाचे कलम वाढवण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी दिली. जखमी शेख नासिर शेख बशीर (वय ३८) याचा शनिवारी घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या गुन्ह्यातील आरोपी फय्याज राजू पठाण याला १५ मे रोजीच अटक केली होती. शुक्रवारी त्याची पोलीस कोठडी संपल्याने न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे, असे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी सांगितले.

# फिल्मी स्टाईल दरोडा! हवेत गोळीबार करत एटीएम मशीन पळवले!

### कवठेमहांकाळ तालुक्यातल्या पंढरपूर महामार्गावरील शिरढोणमधील घटना

सांगली । महाईन्यूज ।

कवठेमहांकाळ तालुक्यातील शिरढोण येथील बँक ऑफ महाराष्ट्राच्या एटीएमवर दरोडा पडला आहे. हवेत गोळीबार करत दरोडेखोरांनी रोकड असलेली एटीएम मशीन थेट गाडीत घालून पळवली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

कवठेमहांकाळ तालुक्यातल्या पंढरपूर महामार्गावरील शिरढोण या ठिकाणी एटीएमवर दरोडा पडला आहे. गावातील मुख्य रस्त्यावर असणाऱ्या भरवस्तीमध्ये असणाऱ्या महाराष्ट्र बँकेच्या एटीएमवर हा दरोडा पडला आहे. अज्ञात दरोडेखोरांनी चक्क हवेत गोळीबार करत बँक ऑफ महाराष्ट्राच्या एटीएम मशीन



थेट पळवून नेले आहे. या एटीएम सेंटरमध्ये असणाऱ्या एटीएम मशीन फोडून त्यापैकी एका एटीएम मशीन मध्ये रोकड नव्हती. त्यामुळे दरोडेखोरांनी ती मशीन तेथेच ठेवून पैशांनी भरलेली एटीएम मशीन चोरून नेली आहे.

रात्रीच्या सुमारास हा धाडसी दरोड्याचा प्रकार घडला आहे. या घटनेनंतर कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कवठेमहांकाळचे पोलीस अधीक्षक दीक्षित गेडाम यांच्यासह अधिकाऱ्यांनी तातडीने धाव घेत पाहणी केली. तसेच दरोडेखोरांच्या शोधासाठी जिल्ह्यामध्ये नाकाबंदी करण्यात आलेली आहे. तसेच पथकेही रवाना करण्यात आली आहेत. पण या एटीएम मशीनमध्ये नेमकी किती रक्कम लंपास करण्यात आली हे समजू शकले नाही.

### अशी घडली एटीएमची चोरी...

मध्यरात्री 2 वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्र बँकेचे एटीएम सेंटर या ठिकाणी दरोडेकर पोहोचले. पहिल्यांदा दरोडेखोरांनी सेंटर मधील सर्व सीसीटीव्हीवर काळा कलर मारला. त्यानंतर एटीएम सेंटरमध्ये घुसून एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न सुरू केला. यातील एका एटीएम मशीनमध्ये पैसे नसल्याने ते एटीएम मशीन सोडून भरलेले एटीएम मशीन दोरीने गाडीला बांधून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर ते एटीएम मशीन गाडीमध्ये घालून चोरट्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला असता आजुबाजूच्या नागरिकांना जाग आली. त्यांनी दरोडेखोरांवर दगडफेक करण्याचा प्रयत्न केला असता दरोडेखोरांनी हवेत गोळीबार करून मशीनसह पोबारा झाले.

# महागाई विरोधात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा मोर्चा

### पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅस चे भाव कमी करा



नाशिक । महाईन्यूज ।

वाढत्या महागाईच्या निषेधार्थ भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) शहर कमिटीच्या वतीने ऍड. तानाजी जायभावे यांच्या नेतृत्वाखाली त्रिमूर्ती चौक ते उत्तम नगर असा मोर्चा काढण्यात आला. पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅस चे भाव कमी करा, गॅससिलेंडरचे अनुदान चालू करा, वाढती महागाई कमी करा यासारख्या मागण्या घेऊन शेकडो कामगार व नागरिकांसह माजी नगरसेवक व गटनेता ऍड.तानाजी जायभावे, तुकाराम सोनजे, अरविंद शहापूरे, विवेक ढगे, दिपक कोर, ज्ञानेश्वर माळी, निलेश मगर, दिपक घोरपडे, राजु सोनवणे, संजय माळी, भीमराव गायकवाड, निलेश तिदमे, राकेश पाटील, राजाराम शेवाळे, प्रदीप देसले, निंबा मराठे, चेतन चव्हाण, बापू सरोदे, मीरा सोनवणे, विजया तिक्कल यासह विविध कंपनीतील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शॉर्ट न्यूज »

### बेनामी संपत्ती प्रकरणी हरयाणाचे माजी मुख्यमंत्री ओम प्रकाश चौटाला दोषी



। हरयाणा । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

हरयाणाचे माजी मुख्यमंत्री ओम प्रकाश चौटाला यांना दिल्लीतील राऊज एवेन्यू कोर्टाने दोषी ठरवलं आहे. उत्पन्नापेक्षा अधिक संपत्ती बाळगल्याप्रकरणी हरयाणाचे माजी मुख्यमंत्री ओम प्रकाश चौटाला यांना दिल्लीतील राऊज एवेन्यू कोर्टाने दोषी ठरवलं आहे. चौटाला यांच्या शिक्षेवर २६ मे रोजी सुनावणी होणार आहे. याप्रकरणी सीबीआयने २६ मार्च २०१० साली चौटाला यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. त्यांच्यावर १९९३ ते २००६ या कालावधीदरम्यान उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती जमा केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. याकालावधीत त्यांच्यावर ६.०९ कोटी रुपयांची माया गोळा केल्याचा आरोप होता.

### आनंदवार्ता : मोदी सरकारचा मोठा दिलासा !

# पेट्रोल 9.50 पैसे तर डिझेल लीटरमागे 7 रु. स्वस्त!

## अर्थमंत्र्यांची घोषणा, अबकारीवरील कपातीचा पेट्रोल-डिझेल असोसिएशनने स्वागत

नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

पेट्रोल आणि डिझेलच्या (Petrol and diesel) वाढत्या दराबाबत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM Narendra Modi) यांनी मोठा निर्णय घेतला असून केंद्रीय अबकारी कर कमी केला आहे. यामुळे देशात वाढणारी महागाई कमी होण्याची शक्यता असून सर्वसामान्यांना हा मोठा दिलासा आहे.

मोदी सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार पेट्रोल आणि डिझेलच्या



दरात (Price of petrol and diesel) मोठी कपात केली असून पेट्रोल लीटरमागे ९.५० पैशांनी स्वस्त तर डिझेल प्रतिलीटर ७ रु. स्वस्त होणार आहे. अबकारीवरील कपातीचा पेट्रोल-डिझेल असोसिएशनने स्वागत केले असून ही दरवाढ तात्काळ लागू करण्यात येणार असल्याचे समजते.

गेल्या काही दिवसांमध्ये क्रूड ऑईलच्या किंमती झपाट्याने खाली येत असताना पेट्रोल आणि डिझेलचे दर मात्र कमी होत नव्हते. तसेच घरगुती सिलेंडर आणि सीएनजीच्या किंमती गगनाला भिडल्या होत्या. घरगुती सिलेंडरच्या वाढणाऱ्या दरांबद्दल मध्यमवर्गीय आणि गृहिणी नाराज होत्या. अखेर मोदी सरकारने देशवासियांना मोठा दिलासा देत वर्षाला मिळणाऱ्या बारा सिलेंडर मागे दोनशे रूपयांची सबसीडी देण्याचाही निर्णय घेतला आहे.

### राज्य सरकारांनी देखील कर कमी करावेत

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर कमी करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पेट्रोलचा दर 9.50 पैसे आणि डिझेलचे दर 7 रुपयांनी कमी होणार आहे. करोनाचं संकट, रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्ध यामुळं निर्माण झालेली स्थिती, महागाईचा फटका यातून नागरिकांना दिलासा मिळावा म्हणून केंद्र सरकारनं कर कमी केले आहेत. केंद्र सरकारनं गेल्या वर्षी देखील पेट्रोल आणि डिझेलवरील कर कमी करण्याची घोषणा केली होती. याशिवाय १२ सिलेंडरवर २०० रुपयांचं अनुदान देण्यात येणार असल्याचं देखील निर्मला सीतारमण यांनी जाहीर केलं आहे. यामुळं केंद्र सरकारला ६ हजार कोटी रुपयांचं नुकसान होणार

## "ज्ञानवापी मशीद परिसरात सापडलेले शिवलिंग १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक"; विश्व हिंदू परिषदेचा दावा



। आयोध्या । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

ज्ञानवापी मशीद प्रकरणातील गुंतागुंत आणि संवेदनशीलता लक्षात घेत सर्वोच्च न्यायालयाने, हिंदु भाविकांनी दाखल केलेला दावा शुक्रवारी दिवाणी न्यायाधीशांकडून (वरिष्ठ) काढून तो वाराणसी जिल्हा न्यायाधीशांकडे सुनावणीसाठी हस्तांतरीत केला. या खटल्यातील गुंतागुंत आणि संवेदनशीलता लक्षात घेतली तर, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ विभाग) वाराणसी यांच्यासमोरील खटला उत्तर प्रदेशातील उच्च न्यायिक सेवेतील वरिष्ठ आणि अनुभवी न्यायाधीशांसमोर चालवावा, असे खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले आहे.

यानंतर विश्व हिंदू परिषदेचे (व्हीएचपी) प्रमुख आलोक कुमार यांनी शुक्रवारी ज्ञानवापी मशीद प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला सहमती दर्शवली आणि दावा केला की सापडलेले शिवलिंग १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे हे हिंदू पक्ष सिद्ध करू शकेल. "हे प्रकरण गुंतागुंतीचे आहे आणि त्यासाठी गंभीर आणि अनुभवी न्यायमूर्तींची गरज आहे, यावर आम्ही सर्वोच्च न्यायालयाशी सहमत आहोत. जिल्हा न्यायालय यात लक्ष घालेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. आम्ही सर्वोच्च न्यायालयाशी सहमत आहोत," असे आलोक कुमार यांनी म्हटले आहे. राज ठाकरेंच्या अयोध्या दौऱ्याला विरोध करणारे BJP चे बृजभूषण सिंह दौरा स्थगित झाल्यावर म्हणाले, "आम्ही योगी आदित्यनाथांचा..." ज्ञानवापी मशिदीत सापडलेले शिवलिंग हे ज्योतिर्लिंगांपैकी एक असल्याचे ते सिद्ध करू शकतील, असे विहिंप प्रमुख म्हणाले. "आम्ही ते शिवलिंग आहे असे मानतो कारण नंदी ते पाहत आहे आणि ते मूळ ज्योतिर्लिंगांपैकी एक असल्याचे स्थान दर्शविते. मुघलांनी मंदिरावर हल्ला केला.

## रस्ता खचल्याने यमुनोत्री महामार्ग पुन्हा बंद; हजारो यात्रेकरू अडकले



। लखनऊ । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

उत्तरकाशी जिल्ह्यातील स्यानाचट्टी आणि रणचट्टी दरम्यानचा रस्ता खचल्याने यमुनोत्री महामार्ग शुक्रवारी संध्याकाळी पुन्हा मोठ्या वाहनांसाठी बंद करण्यात आला. त्यामुळे यमुनोत्री परिसरात हजारो प्रवासी अडकले. दामटा ते जानकीचट्टी दरम्यानही सर्व प्रवासी यमुनोत्री महामार्ग कधी उघडण्याची वाट पाहत आहेत. राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता राजेश पंत म्हणाले, रस्ता लवकरच खुला केला जाईल. यमुनोत्री मंदिराकडे जाणाऱ्या महामार्गाची सुरक्षा भिंत कोसळल्याने सुमारे १०,००० लोक अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रस्त्यांवरील वाहतूक ठप्प झाली असून, महामार्गालगत विविध ठिकाणी १० हजार लोक अडकल्याचे सांगण्यात येत आहे. रस्ता पुन्हा खुला होण्यासाठी ३ दिवस लागू शकतात.

## वादळी वाऱ्यांसहीत आलेल्या तुफान पावसाने बिहारला झोडपले

### 16 जिल्ह्यांमध्ये वीज पडून 33 जणांचा मृत्यू

। पटना । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यासंदर्भात खेद व्यक्त केला आहे, तर नीतीश कुमार यांनी मृतांच्या नातेवाईकांसाठी आर्थिक मदतीची घोषणा केलीय.

भीषण उष्णतेच्या समस्येला तोंड देणाऱ्या बिहारमध्ये शुक्रवारी अचानक मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. वादळी वारे, मेघगर्जनेसहीत बिहारमधील अनेक भागांमध्ये पाऊस पडला. काही तासांच्या या पावसामुळे मोठं नुकसान झालं असून वीज पडल्याने तसेच वादळी पावसाच्या तडाख्याने १६ जिल्ह्यांमध्ये ३३ जणांचा मृत्यू झालाय. बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदतची घोषणा केलीय. मृतांच्या नातेवाईकांना सरकारकडून प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत देणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलंय. बिहारमधील या आस्मानी संकटासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही खेद व्यक्त करतानाच, मदतीचं आश्वासन दिलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बिहारमधील वादळी पावसामुळे आणि वीज पडून मृत्यूमुखी पडलेल्या लोकांना श्रद्धांजली अर्पण करताना घडलेल्या घटनेबद्दल खेद व्यक्त केलाय. मोदींनी ट्विटरवरुन या घटनेसंदर्भात खेद व्यक्त करताना बिहारमधील या घटनांमुळे फार दु:ख झाल्याचं म्हटलं आहे. देव मृतांच्या नातेवाईकांना हे दु:ख सहन करण्याची ताकद देवो, अशी प्रार्थनाही मोदींनी केलीय. राज्य सरकारच्या नेतृत्वाखाली स्थानिक प्रशासन मदत कार्य करत असल्याचंही मोदींनी म्हटलंय.



### वीजपुरवठा बराच वेळ खंडित

बिहारमधील भागलपूर परिसराला वादळाचा सर्वाधिक फटका बसलाय. या ठिकाणी वीज पडून सात जणांचा मृत्यू झालाय. तर मुजफ्फरपूरमध्ये सहा लोकांचा मृत्यू वीज पडल्याने झालाय. गुरुवारी अचानक बिहारमधील वातावरण बदललं. शुक्रवारी अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यांसहीत जोरदार पाऊस झाला. अनेक ठिकाणी झाडं उन्मळून पडल्याचं पहायला मिळालं. अनेक भागांचा वीजपुरवठा बराच वेळ खंडित झाला होता.

# रणवीरला सहन होईना दुरावा



बॉलिवूडमधील सगळ्यात मस्त आणि सतत आनंदित असलेले कपल म्हणून 'दिपवीर' ओळखले जाते. दिपवीर म्हणजेच दीपिका पदुकोन आणि रणवीर सिंग. सध्या ७५ वा कान्स चित्रपट महात्सव खूप उत्साहात सुरु आहे. त्यासाठी बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोन सध्या फ्रान्समध्ये आहे. तिला भेटल्यासाठी तिचा पती अभिनेता रणवीर सिंग हा थेट कान्स चित्रपट महोत्सवात पोहोचला आहे. दीपिकाला रणविर खूप मिस करतोय. त्याला तिच्या सोबत छान वेळ घालवायचा आहे. म्हणून रणवीर सिंग दीपिकाला भेटण्यासाठी थेट कान्स चित्रपट महोत्सवात पोहोचला. रणवीर आणि दीपिका हे हिंदी सिनेसृष्टीमधल एक हसरे खेळते कपल आहे. त्यांचा हाच स्वभाव आणि त्यांची केमिस्ट्री त्यांच्या चाहत्यांना सुद्धा आवडते. शुक्रवारी सकाळी रणवीर सिंग मुंबई विमानतळावर दिसला. कान्स चित्रपट महोत्सवाला जाण्यासाठी रवाना होत होता. नेहमी प्रमाणे त्यावेळीसुद्धा रणवीरने त्यांच्या हटके स्टाईलने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. रणवीरचा फॅशन सेन्स हा नेहमी सर्वांपेक्षा खूप वेगळा असतो आणि त्यासाठी तो नेहमी चर्चेतही असतो. चित्रपटांच्या शूटिंगचे व्यस्त वेळापत्रक आणि चित्रपटांच्या प्रमोशनमध्ये गेले काही दिवस रणबीर खूप व्यस्त होता आणि या सगळ्यातून त्याला ब्रेक हवा होत. त्याचबरोर त्याला त्याचा हा स्पेशल टाईम दीपिकासोबत एन्जॉय करायचा होता म्हणून कान्स चित्रपट महोत्सवात दीपिकाला भेटायला गेला असे रणवीरने सांगितलं. रणवीरसाठी हा ब्रेक म्हणजे एक छोटीशी ट्रिप असल्याचे दिसते. कान्स चित्रपट महोत्सवातले रणवीर आणि दीपिकाचे फोटोस त्यांच्या चाहत्यांना सुद्धा आवडत आहेत.

# सोनाली बेंद्रेच्या डिजिटल डेब्यूचा फर्स्ट लूक रिलीज




बॉलिबूड अभिनेत्री सोनाली बेंद्रे हिची गणना 90 च्या दशकातील सर्वात टॉपची अभिनेत्रींमध्ये केली जाते. आजही तिचा मोठा फॅनबेस आहे. त्याकाळी चित्रपटांसाठी अभिनेत्री म्हणून सोनालीला प्रेक्षकांची पहिली पसंती असायची. प्रेक्षक तिच्या सौंदर्याचे वेड असायचे. यात मोठ्या ब्रेकनंतर सोनाली डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वळली आहे.अभिनेत्री लवकरच 'द ब्रोकन न्यूज' या चित्रपटातून डिजिटल क्षेत्रात पदार्पण करणार आहे. कॅन्सरमधून बरी झाल्यानंतर ती पहिल्यांदाच अभिनय करताना दिसणार आहे. अलीकडेच अभिनेत्रीने या मालिकेतील तिचा पहिला लूक सोशल मीडियावर शेअर केला आहे, ज्यामुळे सोनाली पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या सिरीजमध्ये सोनाली बेंद्रे पत्रकाराची भूमिका साकारत आहे. त्यामुळे सोनालीच्या पत्रकाराच्या भूमिकेतील अभिनय पाहण्यासाठी चाहते फारचं उत्सुक आहेत. ती तिच्या डिजिटल डेब्यू सिरिजचे जोरदार प्रमोशन देखील करत आहे. याचे दिग्दर्शन विनय वैकुल करत आहे, ज्याने अलीकडेच नेटफ्लिक्स 'आरण्यक' या क्राईम थ्रिलरचे दिग्दर्शन केले आहे. ही सिरीज मुंबईतील दोन प्रतिस्पर्धी वृत्तवाहिन्यांवर आधारित आहे. एक चॅनल 'आवाज भारती' आहे, जे एक स्वतंत्र, नैतिक वृत्तवाहिनी आहे आणि दुसरे 'जोश 24/7' हे सनसनाटी आणि आक्रमक पत्रकारितेसाठी ओळखले जाते. ही आगामी सिरीज ZEE5 वर केव्हा प्रदर्शित होणार हे अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. यामध्ये सोनालीसोबत जयदीप अहलावत, श्रिया पिळगावकर, इंद्रनील सेनगुप्ता, तारुक रैना, आकाश खुराना, किरण

# देशाची विभागणी करू नका- अक्षय कुमार

बॉलिवूडमधील महत्वपूर्ण अभिनेत्यांपैकी एक म्हणजे अक्षय कुमार. सोशल मीडियावर अक्षयचे अनेक चाहते आहेत. सिनेसृष्टीत जे काही घडते त्यावर अक्षय स्वतःचे स्पष्ट मत मांडत असतो. असेच मत त्याने बॉलिवूड आणि साऊथ वादावर मांडले आहे. आपण सगळे एकच आहोत. सगळे चित्रपट आपलेच आहेत. त्यामुळे बॉलिवूड आणि साऊथ असा वाद करू नका. देशाची विभागणी करू नका. ते काम इंग्रजांचे आहे ते त्यांनी केले, असे मत पृथ्वीराज या चित्रपटाच्या प्रमोशनवेळी अक्षय कुमारने अक्षय कुमारने व्यक्त केले.


अक्षय म्हणाला की, आपण असे नको करूया आणि त्याबाबत इतर मंडळी काय बोलत आहेत त्यांच्या मला काहीच देणेघेणे नाही. मी सहसा कोणत्या गोष्टीवर बोलत नाही पण गेल्या काही दिवसांपासून मी पाहतोय की बॉलीवूड आणि साऊथ या दोन चित्रपटसृष्टींमध्ये वाद सुरु आहे. प्रत्येक दिवशी काही न काही नवा मुद्दा समोर येत आहे. त्यामुळे मी आज हे बोलतोय. चित्रपट हे दोन्ही ठिकाणचे हिट ठरतात पण भाषिक वाद थांबण्याचे नाव घेत नाही. जेव्हा ब्रिटिश भारतात आले होते तेव्हा सुद्धा त्यांची भारताचे ईस्ट इंडिया, साऊथ इंडिया, नॉर्थ इंडिया असे विभाजन केले होते. पण आता स्वातंत्र्य मिळून एवढी वर्ष झाली तरीही हा वाद मिटत नाही. पण निदान आपण तरी असे नाही करायला पाहिजे. आपण सगळे एकच इंडस्ट्री आहोत तर त्याच भावनेने आपण राहिले पाहिजे आणि दोन्हीकडचे चित्रपट तेवढेच हिट झाले पाहिजेत असेही अक्षय कुमार म्हणाला.

बॉलिवूड विरुद्ध साऊथ यांच्यामधील कोल्ड वॉर गेले अनेक दिवस सुरु आहे. प्रत्येक जण स्वतःचीच बाजू बरोबर आहे हे सिद्ध करताना दिसत आहेत. मागच्या काही दिवसांमधील घडामोडी सांगायच्याच झाल्या तर दाक्षिणात्य अभिनेता महेश बाबू याने बॉलिवूडला मी परवडणार नाही असे म्हटले होते. त्यावरूनही सोशल मीडियावर मोठा वादंग झाला होता. त्यानंतर अभिनेता किच्चा सुदीप याने हिंदी भाषेवरून जे वक्तव्य केले. त्यामुळे सुद्धा तो चर्चेत आला होता. त्यावर बॉलिवूड अभिनेता आज देवगण याने त्याला प्रत्त्युत्तर दिले होते. हा सगळा वाद आणि त्याची चर्चा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत होती. त्यातच बॉलिवूडचा राऊडी राठोड अक्षय कुमार याने सुद्धा आपली तटस्थ भूमिका स्पष्टपणे मांडली. दरम्यान, अक्षय कुमार हा आगामी पृथ्वीराज या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटात अक्षय कुमार पृथ्वीराज चौहान हे मुख्य पात्र साकारत आहे. या चित्रपटात मनुशी छिल्लर सुद्धा झळकणार आहे.



# सानिकाच्या हट्टीपणामुळे दिपूचा जीव धोक्यात?

मन उडु उडु झालं या मालिकेचे येणारे एपिसोड महत्वपूर्ण असणार आहेत, मालिकेला येणार रंजक वळण, सानिकाच्या हट्टीपणामुळे दिपूवर संकट येणार आहे. असं हि मालिकेच्या पुढल्या काही भागात पाहायला मिळणार आहे. मन उडू उडू झालं ही मालिका अल्पावधीतच खूप लोकप्रिय झाली. या मालिकेतील इंद्रा आणि दिपू या जोडीने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली आहे. या मालिकेतील सानिकाच्या चुकीच्या वागण्यामुळे सर्वांनाच त्रास होत असतो. सानिका तिच्या घरच्यांशी सुद्धा खोटं बोलते. पण सानिका गरोदर असल्याचं खोटं सर्वांसमोर येणारे आहे. आणि त्याच बरोबर सानिकाच्या हट्टीपणामुळे



दिपूवर संकट येणार आहे. असं ही मालिकेच्या पुढल्या काही भागात पाहायला मिळणार आहे. खरंतर कोणत्याही कथानकात खलनायकाची किंवा खलनायिकेची भूमिका असली की ते कथानक अधिक रंजक होतं. मन उडु उडु झालं ह्या मालिकेत सुद्धा कार्तिक आणि सानिका ही दोन पात्रं नकारात्मक पात्र साकारताना दिसत आहेत. आणि प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टींवरून त्रागा आणि भांडणं करताना सुद्धा हे दोघ दिसतात. आणि त्याचा त्रास त्यांच्या घरच्यांना होतो. मालिकेतील मागच्या काही भागात सानिका ती गरोदर असल्याचं खोटं सांगताना दिसते आहे. देशपांडेंच्या घरी पूजेला गेल्यावर ती मुद्दामहून पपई खाताना दिसते. आणि त्यामुळे दिपू तिला घेऊन डॉक्टरांकडे जाते, पण सानिका डॉक्टरांकडे जायला नकार देते पण तरी दिपू तिला घेऊन डॉक्टरांकडे जाते. आणि तिथे गेल्यावर सानिका गरोदर असल्याचं नाटक करते यावेळी ती आपल्या सगळ्यांशीच खोटं बोलते आहे हे दिपूला समजतं. घरी चोर ओटी भरताना घरच्यांनी तिला मोठं काही गिफ्ट दिलं नाही म्हणून सानिका खूप त्रागा करते घरच्याना खूप बोलते. हे सगळं सहन न झाल्याने दिपू सगळ्यांना खरं सांगते. त्यावर आत्ता घरच्यांची प्रतिक्रिया काय असणार आहे हे येणाऱ्या भागात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

# वैभव तत्ववादी 'निर्मल पाठक'च्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला

मनोरंजनाच्या माध्यमातून वास्तवतेची जाणीव करून देणारी निर्मल पाठक कि घर वापसी हि नवी वेब सिरीज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वेब सिरीज मध्ये स्पेशल ड्रामा प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.


बिहार राज्यातील एका लहानश्या शहराच्या पार्श्वभूमीवर आधारित 'निर्मल पाठक कि घरवापसी' (NIRMAL PATHAK KI GHAR WAPASI) हि वेब सिरीज प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या वेब सिरीजमध्ये मराठमोळा अभिनेता वैभव तत्ववादी हा मुख्य भूमिकेत दिसणार आहे. असे म्हटले जाते कि आपण आपल्या कंफर्ट झोनमधून बाहेर पडलो, कि आपल्यात बदल हा होतोच. वास्तवाची जाणीव करून देणारा हा विषय या सिरीजमध्ये अगदी मनोरंजक पद्धतीने मांडण्यात आला आहे. निर्मल पाठक कि घरवापसी (NIRMAL PATHAK KI GHAR WAPASI) या वेब सिरीजमध्ये स्पेशल ड्रामा प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. या सिरीजमधून वास्तवतेची जाणीव करून दिली आहे. निर्मल पाठक या तरुणाभोवती हि कथा फिरते. तब्बल २४ वर्षांनंतर हा तरुण त्याच्या मूळ गावी परतला असून त्याचे मूळ गाव शोधण्याच्या प्रवासातूनच हि गोष्ट पुढे जाते. निर्मल पाठक हि व्यक्तिरेखा काहीशी लाजाळू आणि संकुचित स्वभावाची आहे. या वेब सिरीजमध्ये अभिनेता वैभव तत्ववादी (VAIBHAV TATWAWADI) याने निर्मल पाठक हि मुख्य व्यक्तिरेखा साकारली आहे. या भूमिकेबाबत वैभव तत्ववादी सांगतो की, "हि वेब सिरीज आपल्या समाजाबाबत बरंच काही सांगते. आणि अश्या या वेब सिरीजचा मला भाग होता आलं म्हणून मी खूप आनंदित सुद्धा आहे. आपले मूळ शोधणाऱ्या मुलाची कथा आहे. निर्मल पाठक (NIRMAL PATHAK) हा लाजाळू आणि संकुचित वृत्तीचा मुलगा आहे." "काही अंशी मी सुद्धा तसाच आहे. आणि त्यामुळेच हे पात्रं करताना मी त्या भूमिकेमध्ये सहजपणे सामावून गेलो.



## शॉर्ट न्यूज »

### फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा: जोकोव्हिच जेतेपदाचा दावेदार - सोमदेव

। नवी दिल्ली। महाईन्यूज ।



दुखापतीमुळे राफेल नदाल फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत खेळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे नोव्हाक जोकोव्हिच जेतेपदाचा दावेदार असल्याचे मत भारताचा माजी टेनिसपटू सोमदेव देववर्मनने व्यक्त केले. "मातीच्या कोर्टवर नदालचे वर्चस्व कायम असते. परंतु त्याला २०२१ मध्ये बऱ्याच दुखापतींना सामोरे जावे लागले. त्यातून सावरत त्याने ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेत आपला खेळ उंचावला. पण रोममध्ये त्याला पुन्हा दुखापत झाली. वयामुळे अशा दुखापतींचे आव्हान सोपे नसेल. पण लढवय्या नदाल यातून नक्की सावरेल. या स्पर्धेत खेळू शकला नाही तर जोकोव्हिचच ही स्पर्धा जिंकू शकतो," असे सोमदेवने सांगितले. "जोकोव्हिच जरी कमी सामने खेळला असला तरी त्याने रोममधील इटली खुली स्पर्धा जिंकली आहे.

### 26 विकेट्स घेऊन एकाच पर्वात सर्वात जास्त बळी घेणारा भारतीय फिरकीपटू होण्याचा मान

# चेन्नईविरोधात खेळताना चहलने मोडला हरभजन सिंगचा विक्रम!

### राजस्थान रॉयल्स संघाने आपले प्लेऑफमधील स्थान केले निश्चित

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी ।



आयपीएलचे पंधरावे पर्व शेवटच्या टप्प्यात आहे. सध्या मोजकेच साखळी सामने शिल्लक राहिले असून सर्वांनाच प्लेऑफच्या सामन्यांचा थरार अनुभवण्याची उत्सुकता लागली आहे. दरम्यान चेन्नईला नमवून राजस्थान रॉयल्स संघाने आपले प्लेऑफमधील स्थान निश्चित केले आहे. तसेच राजस्थान संघातील फिरकीपटू युझवेंद्र चहलने मोठा विक्रम रचला असून त्याचीदेखील वाहवा होत आहे.

युझवेंद्र चहलने चेन्नई विरुद्ध राजस्थान या सामन्यात मोठी कामगिरी करुन दाखवली. त्याने या सामन्यात २६ धावा देत दोन बळी घेतले. या कामगिरीनंतर या एका हंगामात २६ बळी नोंदवले गेले आहेत. त्याने या हंगामात २६ विकेट्स घेऊन एकाच पर्वात सर्वात जास्त बळी घेणारा भारतीय फिरकीपटू होण्याचा मान मिळवला आहे. याआधी हा विक्रम फिरकीपटू हरभजन सिंह याच्या नावावर होता.

हरभजनने आयपीएलच्या एकाच हंगामात २४ विकेट्स घेतलेल्या होत्या. २०१३ साली हरभजन सिंगने या विकेट्स घेतल्या होत्या.

युझवेंद्र चहलने इमरान ताहिर या फिरकी पटूची बरोबरी केली आहे. ताहीरने एकाच पर्वात २६ विकेट घेतलेल्या आहेत. दरम्यान, चहलचा संघ म्हणजेच राजस्थान रॉयल्स हा संघ प्लेऑफमध्ये पोहोचला आहे. त्यामुळे आगामी काळात हा संघ काही सामने खेळणार असून या सामन्यातं चहलने एक धावजरी घेतली तरी इमरान ताहीरचा विक्रम मोडीत निघेल.

# हेटमायरच्या पत्नीबद्दल सुनिल गावस्करांचं वादग्रस्त वक्तव्य

### वक्तव्य मानहानीकारक असल्याचे अनेक क्रिकेटप्रेमींचे मत



नवी दिल्ली । महाईन्यूज

कॉमेन्ट्री बॉक्समध्ये आपल्या मजेदार वक्तव्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या समालोचकांपैकी एक म्हणजे भारताचे माजी क्रिकेटपटू सुनिल गावस्कर. मात्र काल झालेल्या चेन्नई सुपरकिंग्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स सामन्यामध्ये कॉमेन्ट्रीदरम्यान मजेदार वक्तव्य करण्याच्या नादात सुनील गावस्कर यांनी केलेल्या वक्तव्यावरुन वाद निर्माण झालाय. सुनील गावस्करांनी वेस्ट इंडिजचा खेळाडू शिमरोन हेटमायरच्या पत्नीबद्दल केलेल्या विधानावरुन वाद झालाय. अनेकांनी गावस्कर यांनी केलेलं हे वक्तव्य मानहानीकारक असल्याचं मत व्यक्त केलंय. ेन्नईच्या संघाविरुद्ध हेटमायरला संघात स्थान देण्यात आलेलं. फलंदाजीसाठी हेटमायर मैदानात आला. हेटमायरने संघाचा नेट रनरेट चेन्नईपेक्षा अधिक राहील या हिशोबाने फटकेबाजी करणं अपेक्षित होतं. हेटमायर मैदानावर आल्यावर क्रीजवर सेट होत असतानाच तो पहिला चेंडू खेळण्याआधीच गावस्कर मजेदार वक्तव्य करण्याच्या नादात नको ते बोलून गेले. "मोठा प्रश्न हा आहे की शिमरोन हेटमायरच्या पत्नीने नुकतीच डिलेव्हरी केलीय, आता हेटमायर राजस्थान रॉयल्ससाठी डिलेव्हर करु शकेल का?", असं गावस्कर म्हणाले. गावस्कर यांनी हेटमायच्या पत्नीचं बाळंतपण झाल्याचा संदर्भ देत डिलेव्हरी हा शब्द काहीतरी करुन दाखवणे या अर्थाने डिलेव्हरी म्हणून वापरण्याच्या नादात शब्द खेळ करत हे वक्तव्य केलं.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही